(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# कायदे आणि महिला सशक्तीकरण

**कु. प्रज्ञा प्रसन्न भाटे** संशोधक विद्यार्थी समाजशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

---

**प्रस्तावना-**

सरकार मुलीच्या महिलांच्या विकासासाठी नेहमी कटिबद्ध आहे. महिलांना सुरक्षित वातावरण देणे हे सर्वांचे कर्तव्य ठरते. स्त्री-पुरुष यांच्यामध्ये भेदभाव न करता समाजात महिलांना सन्मानाने जगता यावे व त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर कायदयांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येते. भारतीय राज्यघटनेने महिलांना समानतेचा मूलभूत हक्क दिला आहे. याशिवाय, महिलांना सामाजिक, अर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय गैरसोय दूर करण्यासाठी सकारात्मक भेदभावाचे उपाय करण्याचे अधिकार राज्यांना दिले आहेत.

काळाच्या ओघात कुटुंब संस्थेचा विकास होत असताना महिलांचे कार्यक्षेत्र संकुचित होत गेले. कुटुंबाच्या जबाबदाऱ्या स्विकारताना समाजातले मूल्यही हरवत गेले. अनेक रुढी, परंपरेच्या नावाखाली स्त्री हा घटक बळी पडत गेल्या. आजच्या आधुनिक म्हणवणाऱ्या समाजातती पुरुष प्रधान मानसिकता स्त्रियांना एक माणूस व समाजाचा घटक म्हणून स्विकारताना आढळून येत नाही. स्त्री-भ्रूण हत्येपासून ते पैशांसाठी, चारित्र्यावरून तिचा जीव घेण्यापर्यंत समाजात घटना घडत आहेत. म्हणून महिला संबधीचे अनेक कायदे, अटी नियम बनवावे लागले. स्वातंत्र्यपूर्वी सतीबंदीचा कायदा बनविला गेला. नंतर काळानुरूप महिलांच्या सक्षमीकरणांसाठी अनेक कायदे, अटी, नियम बनवले गेले आहे. त्याची भारताचा एक नागरिक म्हणून प्रत्येक स्त्री व पुरुषाला माहिती असणे गरजेचे आहे. प्रस्तुतच्या शोध निबंधामध्ये अशा काही कायद्याचा आढावा घेणार आहोत जे स्त्री सक्षमीकरणासाठी जबाबदार आहेत.

**संशोधनाचा हेतू -**

1) भारतीय संविधानाने व संसदेने देशातील प्रत्येक महिलेला सबला बनवण्यासाठी काही कायदे बनविले आहेत त्यांचा अभ्यास करणे.

2) हिंदू कायदयातील स्त्रियांचे स्थान जाणून घेणे.

3) महिलांचे स्थान व प्रतिष्ठा उंचावणे.

**संशोधन स्त्रोत-**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, शोधनिबंध, वर्तमानपतत्रातील निवडक लेख तसेच इंटरनेटवरील संदर्भ साहित्यांचा आधार घेण्यात आलेला आहे.

**संशोधन पद्धती-**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**सैध्दांतिक दृष्टीकोन-**

प्रस्तुत शोधनिबंध हा समाजातल्या प्रत्येक महिलेला तिचे समाजातील महत्त्व, अधिकार आणि हक्क यांची जाणीव करून देण्यासंदर्भात आहे.येथे उदारवादी नारीवाद हा सैद्धांतिक दृष्टिकोन लागू होतो. नोकरदार महिलांनाही त्यांच्या संदर्भात वेळोवेळी केलेल्या कायदयाची माहिती असायला हवी. किंबहुना त्यांना काही अडचणी निर्माण झाल्यास त्या त्यांनी या कायद्यांच्या आधारे सोडवायला हव्यात, तेव्हा नोकरदार महिलांना त्यांच्या अधिकार आणि हक्कांच्या कायदयांची माहिती साध्या-सोप्या शब्दांत या शोधनिबंध द्वारे करून देण्याचा हा एक प्रयत्न आहे.

**आशय विश्लेषण-**

स्वातंत्र्यानंतर प्रजासत्ताक भारताच्या राज्यघटनेने महिलांचा समानतेचा मूलभूत हक्क मान्य केला. महिला व इतर अनेक दुर्बल घटकांना संरक्षण, सवलतीशिवाय वेळोवेळी कायदे करण्याची तरतूदही घटनेत करण्यात आली. कायदा हा जीवनातील प्रत्येक टप्प्यावर स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यात महत्त्वाचा ठरतो. हे सत्य असले तरी विषमता, दारिद्र्य, सामाजिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती, पुरुषप्रधानता, पितृसत्ताक पद्धती, जातिभेद, वर्णद्वेष, धार्मिक ताणतणाव, मानसिकता अशा कित्येक कारणांनी घटनेने दिलेली समानता प्रत्यक्षात यायला मात्र अनंत अडचणी निर्माण होतात. तेव्हा माहिलांनाही त्यांचा हक्क मिळायला हवा, यासाठी विविध महिला कायदे करण्यात आले शिवाय वेळोवेळी परिस्थितीप्रमाणे महिलांबद्दलच्या कायदयात इतर कायदयाप्रमाणे सुधारणा करण्यात आल्या.

भारतीय घटनेने प्रत्येक नागरिकाला दिलेले मूलभूत अधिकार असे आहेत-

1) समानतेचा अधिकार

2) स्वातंत्र्याचा अधिकार

3) शोषणाला विरोध करण्याचा अधिकार

4) धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार

5) शिक्षण व संस्कृतीचा अधिकार

6) घटनेच्या संवैधानिक संरक्षणाचा अधिकार.

मात्र, अनेक वेळा महिलांच्या बाबतीत या मूलभून अधिकारांवरच बंधने येताना दिसतात. महिला याही एक स्वातंत्र्य व्यक्ति आहेत. भारताच्या नागरिक आहेत आणि घटनेने नागरिक या नात्याने तिला दिलेले अधिकार वापरण्यासाठी या अधिकारांची तिला जाणीव करुन देण्याची गरज आहे. यासंदर्भातील काही कायदे पुढीलप्रमाणे:

1. हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा 1856.

हा ईस्ट इंडिया कंपनीने ब्रिटिश भारतात अमलात आणलेला कायदा होता. या कायद्याद्वारे हिंदू विधवांनी केलेले पुनर्विवाह कायदेशीर ठरले. याचा मसुदा लार्ड डलहौसीच्या सत्ता कालात लिहिण्यात आला आणि लॉर्ड कॅनिंगने हा अमलात आणला. हा कायदा 1857 च्या स्वातंत्र्ययुद्धाआधी 27 जुलै, 1856 रोजी अमलात आला.

कौटुंबिक सन्मान आणि कौटुंबिक मालमतेचे संरक्षण करण्यासाठी, हिंदू समाजाने विधवा, अगदी लहान मुले आणि पौगंडावस्थेतील लोकांच्या पुनर्विवाहाला फार पूर्वीपासून परवानगी दिली नाही, त्यांनी सर्वांनी तपस्याचे आणि त्यागाचे जीवन जगावे अशी अपेक्षा होती. 1856 च्या हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा, हिंदू विधवेशी पुनर्विवाह करण्यासाठी विशिष्ट प्रकारचे वारसा गमावण्यापासून 'कायदेशीर संरक्षण प्रदान केले, तथापि, कायदयानुसार, विधवेने तिच्या मृत व्यक्तिकडून कोणताही वारसा सोडला. या कायदयात विशेषतः त्या बालविधवांना लक्ष्य करण्यात आले होते ज्यांचे पती विवाहापूर्वीच मरण पावले होते.

लॉर्ड डलहौसी यांनी विरोधाला न जुमानता वैयक्तिकरित्या या विधेयकाला अंतिम रूप दिले आणि ते तत्कालीन प्रचलित रीतीरिवाजांचे स्पष्ट उल्लंघन मानले जात होते. अशा प्रकारे ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी संपूर्ण भारतातील हिंदू विधवांचे भविष्य बदलले, जे 19 व्या शतकात सामाजिक दुष्कृत्यांमध्ये बुडलेल्या हिंदू धर्माच्या सुधारणेसाठी आवश्यक होते.

2. हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम, 1956.

हिंदू दत्तकाचा कायदा 1956 मध्ये संसदेने मंजूर केला. या कायदयातील तरतुदींच्या आधारेच फक्त दत्तक घेता येईल. या कायदयातील तरतुदीविरुद्ध दत्तक घेतले गेल्यास सदर दत्तकनामा / पत्र हे पूर्णपणे बेकायदेशीर व मुळात झालेलेच नव्हते असे कायदा समजेल आणि असे झालेले दत्तक पत्र कुटुंबातील कोणत्याही सदस्याचे कोणतेही हक्क हिरावून घेऊ शकणार नाही.

दत्तकबाबत हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम, 1956 मध्ये दत्तक संदर्भातील महत्त्वाची माहिती खालीलप्रमाणे - हा अधिनियम जम्मू आणि काश्मीर राज्य खेरीज करून भारतातील सर्व हिंदू धर्मियांना लागू आहे.

कलम 6 - दत्तकग्रहणासाठी आवश्यक बाबी-

1) दत्तक घेणाऱ्या व्यक्तीला दत्तक घेण्याची क्षमता व अधिकार असावा,

2) दत्तक देणाऱ्या व्यक्तीला दलक देण्याची क्षमता असावी.

3) दत्तक घेतल्या जाणाऱ्या व्यक्तिला दत्तक घेतले जाण्याची क्षमता असावी.

4) हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम, 1956 या कायदयातील तरतुदींचे उल्लंघन करून झालेले दत्तकग्रहण बेकायदेशीर असेल, मग असे दत्तकग्रहण कोणत्याही जातीच्या व्यक्तींमधील असो.

3. प्रसूती रजा कायदा 1961.

1961 च्या मॅटर्निटी बेनिफिट अँक्टनुसार, गरोदर स्त्रीला बाळंतपणात कमीत कमी तीन महिन्यांची (12 आठवडे) सुट्टी मिळणे हे बंधनकारक आहे. याचबरोबर बाळाच्या जन्मानंतर मातेला किमान सहा आठवडत्यांची सुट्टी मिळणे बंधनकारक आहे. काही वेळेस मात्र अशी सुट्टी घेतलेल्या महिलेला रजेनंतर आपल्याला पुन्हा कामावर घेतले जाईल का किंवा कामावरून कमी तर करणार नाहीत ना अशी काळजी असते, पण गरोदरपणासाठी एखादया स्त्रीने सुट्टी घेतली असल्यास त्या काळात तिला कामावरून कमी करता येत नाही. तेव्हा बाळंतपण हे संकट आहे असे नोकरदार महिलांनी मानण्याचे कारण नाही. याशिवाय कायदयात सांगितल्यानुसार गरोदरपणासाठी कामावर गैरहजर राहिलेल्या स्त्रीस तिचा पूर्ण पगार देण्याची तजवीज आहे. तसेच तिला इतर लाभही देणे बंधनकारक आहे.

मॅटर्निटी बेनिफिट अँक्टच्या या सवलती मृत मूल जन्माला आले तरीही मिळतात. याचप्रमाणे बाळंतपणाच्या 26 आठवडयांच्या आत गर्भपात झाल्यास किंवा करावा लागल्यास प्रसूतीच्या रजाप्रमाणे सवलत घेता येते. फक्त शासकीय नोकरी करणाऱ्या महिलांनाच नाही तर निमशासकीय, खाजगी संस्था येथेही काम करणाऱ्या महिलांना प्रसूती रजेचा अधिकार देण्यात आलेला आहे.

घटनेने महिलांना अधिकार आणि हक्क दिले असताना आजमितीलाही या स्पर्धात्मक जगात छुप्या पद्धतीने वा आडमार्गाने केवळ तिला प्रसूतीसाठी रजा लागेल या कारणापायी तिची संधी नाकारली जाऊ शकते. अशा वेळेस एक नोकरदार महिला म्हणून आपल्या हक्क आणि अधिकारांची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी सामूहिक तत्वावर हालचाल करण्यात महिला नक्कीच पुढाकार घेऊ शकतात.

4. गर्भपाताबाबतचा कायदा, 1971.

आजमितीलाही मुलगा मुलगी समसमानतेचा नारा मोठयांदा दयावा लागतो. सामाजिक समतोलाच्या दृष्टीने आवश्यक असलेले स्त्री-पुरुषांचे विशिष्ट प्रमाण टिकवण्यासाठी, स्त्री- भुणहत्या रोखण्यासाठी गर्भलिंग तपासणीविरोधी कायदा म्हणजेच पीसीपीएनडीटी कायदा आवश्यक ठरतो.

काही विशिष्ट परिस्थितीमध्ये गर्भपात करुन घेण्याचा हक्क मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेगन्सी अँक्ट 1971 च्या कायदयानुसार, प्रत्येक स्त्रीला मिळालेला आहे, तो ही आवश्यक ठरतो. गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंग तपासणी विरोधी कायदा हा गर्भलिंग तपासणी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या गैरवापराला आळा घालण्यासाठी आलेला कायदा आहे. यामुळे महिलांच्या कायदेसंमत गर्भपाताच्या हक्कांमध्ये कोणतीही आडकाठी येत नाही. मात्र गर्भपात हा सरकारमान्य गर्भपात केंद्रातूनच केला पाहिजे, घरगुती पद्धतीने अप्रशिक्षित व्यक्तीकडून गर्भपात करण्याला कायदा परवानगी देत नाही.

मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या घटताना दिसत आहे. याला प्रतिबंध घालण्यासाठी 'गर्भलिंग चिकित्सा प्रतिबंधक' या कायदयाची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरु आहे. यातील सर्व गुन्हे दखलपात्र आणि आजामीनपात्र आणि नान कम्पोन्डोबल करण्यात आले आहेत. या कायद्यान्वये गर्भातील लिंग तपासणी करणाऱ्या व्यक्तिला आणि अशी तपासणी करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकाला दंड आणि शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. गर्भलिंग निदान करून मागणाऱ्या नातेवाईक आणि एजेंट यांना ही दंड आणि शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. गरोदर महिलेवर कोणताही गुन्हा या कायदयाने दाखल होत नाही. राज्य, जिल्हा आणि तालुका पातळीवर या कायदयाच्या अंमलबजावणीची यंत्रणा कायदयामध्ये नमूद आहे.

5. महिलेचे कौटुंबिक हिसांचारापासून संरक्षण अधिनियम 2005.

महिलांचे कौटुंबिक हिसांचारापासून संरक्षण आधिनियम 2005 संबंधित कलम 3 अंतर्गत कौटुंबिक छळ म्हणजे शारिरीक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक किंवा अर्थिक छळ, हुंडा, किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमानित करणे, तिला शिवीगाळ करणे, विशेषतः अपत्य नसल्यामुळे तिला हिणवणे, किंवा धमकावणे या सर्व कृती कौटुंबिक हिसांचार समजण्यात येतील.

कलम 4 अन्वये, कोणतीही व्यक्ति ज्याला कौटुंबिक छळाबद्दल माहिती असल्यास तो त्याबाबत संरक्षण अधिकाऱ्याला, सेवापुरविणाऱ्याला कळवू शकतो तसेच या कायदयाखाली कोणतीही पीडित महिला स्वतः सरळ पोलीस स्टेशनामध्ये / दंडाधिकाच्याकडेही तोंडी किंवा लेखी तक्रारदाखल करु शकते.

कलम 18 नुसार, विद्यमान न्यायदंडाधिकारी पीडित व्यक्ति आणि गैरहजर यांना बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि हिसांचार झाला आहे किंवा होण्याची शक्यता आहे याची प्रथम दर्शनी खात्री करून घेतल्यानंतर पीडित महिलेला अनुकूल असा संरक्षण आदेश देऊ शकतो तसेच कलम 19 नुसार, पीडीत महिलेला विभागून दिलेल्या घराचा ताबा काढून घेतला असेल किंवा विभागून दिलेल्या घरात असलेल्या घरापासून दूर होण्याची आदेश मागू शकते किंवा ती राहत असलेल्या घरात गैरहजर यांना प्रवेश करण्यासाठी प्रतिबंध करण्याचा मनाय हुकूम किंवा इत्यादी निवासी आदेश पीडित महिला मागू शकते.

6. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम 2013.

घटना 1997 सालातील आहे. कायदयाने अल्पवयीन मुलीचा विवाह अमान्य केला आहे, पण राजस्थानातील एका उच्चवर्णीय घरात अल्पवयीन मुलीचा हा विवाह सोहळा होत होता. तेव्हा तिथे ग्रामसेविकेचे काम करत असलेल्या भँवरीदेवी हिने विवाह थांबविण्याचा प्रयत्न केला. तिथे उपस्थित असलेल्यांना उच्चवर्गीयांना ही हा विरोध सहन झाला नाही. त्यामुळे विवाहात सहभागी असणाऱ्या उच्चवर्णीय व्यकितनी भँवरीदेवीवर सामूहिक बलात्कार केला. भँवरीदेवीवरच अतिप्रसंग झाला होता. ग्रामसेविका असलेल्या भँवरीदेवी सरकारी कर्तव्य बजावत असतानाच हा प्रसंग तिच्यावर उद्भवला

होता. ही घटना म्हणजे एका अर्थाने भँवरीदेवीचे कामकाजाच्या ठिकाणी झालेले लैंगिक शोषणच होते. मात्र, त्यावेळी कायदा तिला कोणतीही मदत करू शकला नाही याचे कारण होते या गुन्हयासंबंधी कोणतीच कायदेशीर तरतूद तेव्हा नव्हती. तेव्हा याबाबतीत सर्वच संघटनांनी आवाज उठवला. राजस्थानातील स्वयंसेवी महिला संघटनांनी एकत्र येऊन सर्वोच्च न्यायालयात राजस्थान सरकारविरुद्ध खटला दाखल केला. ही केस 'विशाखा आणि इतर विरुद्ध राजस्थान राज्य' या नावाने ओळखली गेली. या केसच्या निमित्ताने सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक अत्याचाराबाबत 1997 मध्ये काही मार्गदर्शक तत्वे सांगितली. याला विशाखा गाइडलाइन म्हटले गेले.

अलीकडच्या काळात मात्र लैंगिक छळाच्यासंबधात अनेक केसेस सातत्याने समोर आल्या तेव्हा पुन्हा एकदा कायदा करणे भाग पडले. म्हणूनच शासनाने विशाखा गाइडलाइनच्या आदेशात काळानुरुप सुधारणा करुन काही गोष्टींची भर घालून आणि काही बाबी वगळून 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम 2013' हा संसदीय कायदा केला.

या कायद्या अंतर्गत लैंगिक अत्याचाराची व्याख्या करण्यात आली आहे ती अशी -

जेव्हा एखादी व्यक्ति बोलून, न बोलता कृतीने किंवा स्पर्शाने, लैंगिक अर्थाने ओतप्रोत कृत्य अथवा लैंगिक उद्देशाने एखादया महिलेला त्रास देते: ज्यामुळे त्या महिलेला मानसिक धक्का बसतो, तेव्हा त्यास 'लैंगिक छळवणूक होते आहे, असे समजावे.

**निष्कर्ष-**

1) महिला सक्षमीकरणाच्या हेतूने नवीन होऊ घातलेल्या कायद्यान्वये अनेक प्रकरणांत महिलांना अधिक संरक्षण व कायदेशीर तरतुदींचा लाभ झाला.

2) महिलांसाठी अनेक कायदे घटनेत नमूद आहेत. मात्र नुसते कायदे आहेत, म्हणून चालणार नाही किंवा कायदे होऊन चालणार नाही तर त्यांची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

3) प्रत्येक महिला आपल्या हक्कांसाठी, स्वातंत्र्यासाठी आणि स्वतःवर होणाऱ्या अन्यायांविरुद्ध आवाज उठवू शकते.

4) कायदयासमोर समानता किंवा महिलांसह सर्व नागरिकांना कायदयाच्या समान संरक्षणाची हमी देते.

5) भारतातील महिला सशक्तीकरण कायद्याद्वारे लैंगिक समानता वाढवून आणि अर्थिक विकासाला चालना देऊन देशाच्या प्रगतीत महत्वपूर्ण योगदान मिळाले.

***सारांश-**

भारतामध्ये लैंगिक महिला सक्षमीकरण साध्य करण्या मागे सामाजिक- सांस्कृतिक, अर्थिक आणि राजकीय घटकांचा समावेश आहे, स्त्री-पुरुष समानता प्राप्त करण्यासाठी महिला सक्षमीकरण आवश्यक आहे .महिला आता मुलगी, सून, पत्नी, माता या चौकटीत न राहता स्वावलंबी बनत आहेत. त्या अधिकारी, वैज्ञानिक, शिक्षक, कर्मचारी , मालक अशा अनेक रुपांनी आपल्या समोर येत आहेत. त्यांनी ही चमक आपल्या कर्तृत्वाने मिवली आहे. महिला स्वतःच्या बुद्धीला, आत्मसन्मानाला, कल्पनांना नवीन दिशा देण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र हे सारे खरे असले तरी आजमितीलाही स्त्रीला खऱ्या अर्थाने समानतेची वागणूक मिळत नाही हे कटू सत्य आपल्याला मान्य करावे लागेल. अधिकारांच्या अनेक संधी, हक्कांच्या संधी तिच्याकडून केवळ ती महिला आहे म्हणून काढून घेतल्या जातात. महिलांना त्याच्या न्याय हक्कांपासून डावललं जात असल्याची अनेक उदाहरणे आपल्या आसपास पाहायला मिळतात. या परिस्थितीत कायद्यातल्या विविध तरतुदी महिलांच्या उपयोगी येऊ शकतात. महिलाशक्तिच्या कर्तृत्वाला मान देत तिला संधी देत, समान हक्क देत राहिलो तर येत्या दशकभरात महाराष्ट्राचाच काय देशाचाही कायापालट झाल्याशिवाय राहणार नाही.

***संदर्भग्रंथ-**

1) पवार दिपक (2017), महिलांचे राजकीय सक्षमीकरण, श्री साईनाथ प्रकाशन, पुणे.

2) रहाटकर विजया (2018), नोकरदार महिलांसाठी उपयुक्त कायदे, साहिल प्रकाशन, मुंबई.

3) झोडे सुनिल, महिला सक्षमीकरण आणि सद्य:स्थिती, सुगावा प्रकाशन, पुणे.

4) धर्माधिकारी ज्योति (2018), विश्वातील सामर्थ्यशाली स्त्रिया, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

5) महाजन जयश्री (2023), महिला सक्षमीकरण, अथर्व प्रकाशन, जळगाव.

6) शेख अमीर (2018), महिला व बालविकास कायदे, निराली प्रकाशन, पुणे.

7) कुमार सतीश (2024), महिला सशक्तिकरण वर्तमान परिदृश्य, नालंदा प्रकाशन.